# गोवा सरकार

# अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा संचालनालय

## सांत इनेज, पणजी, गोवा

## सन २०२२ ची जाहिरात क्र. ३

गोवा राज्यामध्ये **उत्तर आणि दक्षिण गोवा** जिल्ह्यामध्ये **आपदा मित्र/आपदा सखी (आपत्ती प्रतिसादासाठी समाज स्वयंसेवक)** या पदावर नोंदणी करण्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत, ज्यात पूर्ण नाव, संपूर्ण पत्ता, जन्म तारीख आणि शैक्षणिक पात्रता याची माहिती दिलेली असेल तसेच सक्षम अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती यांच्यासह अर्जाच्या उजव्या कोपऱ्यात पासपोर्ट आकाराचे छायाचित्र चिकटवलेले अर्ज संचालक, अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा संचालनालय, सांत इनेज, पणजी, गोवा यांना खाली नमूद करण्यात आलेल्या जागा भरण्यासाठी **दिनांक १३/१०/२०२२** रोजी पूर्वी पोहोचतील अशा रीतीने पाठवावेत.

| **आपदा मित्र / आपदा सखी** | | |
|---|---|---|
| १. | **आवश्यक शैक्षणिक पात्रता** | (१) किमान ७ वी इयत्ता उत्तीर्ण<br>(२) कोंकणी आणि मराठी भाषेचे ज्ञान |
| २. | **शारीरिक मानके** | **पुढीलपैकी किमान शारीरिक मानके असावीत :-**<br>**(१) <u>पुरुष (आपदा मित्र ) उमेदवार</u> :-**<br>(a) बूट किंवा पादत्राणांशिवाय उंची - १५७ सेंमी.<br>(b) छाती (सामान्य) - ७९ सेंमी.<br>(c) छाती (फुगवून) - ८४ सेंमी.<br>(d) छाती (फुगवटा) - ०५ सेंमी.<br>(e) अंदाजे ५० किग्रॅ.चा भार घेऊन एका मिनिटामध्ये १०० मीटर पळणे किंवा १३ सेकंदांच्या आत १०० मीटर धावण्याची क्षमता.<br>**(२) <u>स्त्री (आपदा सखी) उमेदवार</u> :-**<br>(a) बूट किंवा पादत्राणांशिवाय उंची - १५३ सेंमी.<br>(b) अंदाजे ४० किग्रॅ.चा भार घेऊन एका मिनिटामध्ये १०० मीटर पळणे किंवा १५ सेकंदांच्या आत १०० मीटर धावण्याची क्षमता.<br>उमेदवार हा उत्तम शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य असणारा असावा (वैद्यकीय सदृढता प्रमाणपत्र आवश्यक) |
| ३ | **वय** | उमेदवार (आपदा मित्र आणि आपदा सखी) हा १८ ते ४० वर्षे **वयोगटातील** असणे आवश्यक. |
| ४ | **अनुभव** | उमेदवार (आपदा मित्र आणि आपदा सखी) हा एनवायकेएस, एनसीसी, एसएसएस, भारत स्काउट आणि गाईड आणि माजी सैनिक आणि वैद्यकीय व्यावसायिक असल्यास आणि विहित वयोगटातील असल्यास प्राधान्य देण्यात येईल. तसेच आपत्कालीन प्रतिसाद कार्यक्रमात स्वयंसेवक म्हणून काम केलेले असल्यास उपकारक होईल. |

उमेदवार हा संबंधित जिल्ह्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. स्वयंसेवेसाठी पात्रता पडताळणीसाठी घेण्यात येणाऱ्या तोंडी परीक्षेनंतर पात्र उमेदवार निवडण्यात येईल. निवड केलेल्या उमेदवारांना १२ दिवस कालावधीचे प्रशिक्षण देण्यात येईल.

**सही/-**
**नितीन व्ही रायकर**
**संचालक**
**अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा**